H&RA®
WESTERN INDIA
Estd : 1951

नवराष्ट्र

**उपलब्धी** ● उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना विविध पुरस्कार, क्षेत्राला मिळेल चालना

# एचआरएडब्ल्यूआयतर्फे हॉटेल व्यावसायिकांचा सन्मान



**नागपूर.** हॉटेल अँण्ड रेस्टॉरंट असोसिएशन, वेस्टर्न इंडिया (एचआरडब्लूआय) मुंबईतर्फे नागपूरच्या व्यावसायिकांना त्यांच्या उल्लेखनीय योगदानासाठी एम्पॉवरिंग हॉस्पिटॅलिटी कॉनक्लेव्ह व अवॉर्ड कार्यक्रमात सन्मानित केले.

कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून केंद्रीय पर्यटन मंत्रालयाचे प्रादेशिक उपसंचालक सगनिक चौधरी, प्रमुख अतिथी पोलिस आयुक्त रविंद्र सिंघल, एफएचआरएआयचे अध्यक्ष प्रदीप शेट्टी, एनआरएचएचे अध्यक्ष तेजिंदर सिंग रेण उपस्थित होते. यावेळी सिंघल यांनी कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यात सहकार्य करण्याचे आवाहन केले. राजेश चोपडे यांनी आतिथ्य उद्योगासाठी सायबर पद्धत, हेमंत खडसे यांनी अग्निसुरक्षेवर, जितेंद्र गावडे यांनी कीटनाशक व कीट नियंत्रणावर, सीए जुल्फेश शाह यांनी नवीन पर्यटन धोरणावर विस्तत माहिती दिली. यावेळी एचआरडब्लूआयने हल्दीराम ग्रुपचे सीएमडी शिवकिशन अग्रवाल यांनी जीवनगौरव पुरस्कार, हॉटेल सेंटर पॉइंटचे जसबीर सिंग अरोरा, हॉटेल नागपूर अशोकाचे संजय गुप्ता, हॉटेल प्राईड सीईओ व संचालक सत्येन जैन, हॉटेल प्रितमचे तजिंदर सिंग रेणू यांना सन्मानित केले. तसेच अनिल नायर, प्रफुल देशमुख यांना नवीन हॉटेल्सचा पुरस्कार देण्यात आला. सोबतच अनेक व्यावसायिक मनोज बाली, श्रीकांत मलिक, ओम अशोक हंसल, अमित कंडवाल यांनाही पुरस्कृत करण्यात आले.

Orange City Plus Edition Edition
Aug 12, 2024 Page No. 5
Powered by: